पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/६३०४२१/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक-०५/०१/२०२४

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दिनांक ०६/०१/२०२४ रोजी मा व्ही.आय.पी हे देहूरोड वाहतूक विभागाचे हद्दीत शिवसंकल्प अभियान मेळावा मुकाई चौक,किवळे,देहूरोड या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत.सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने कार्यक्रमास मोठ्या संख्येने कार्यकर्ते,प्रतिनीधी इतर नागरीक उपस्थित राहणार असल्याने मा व्ही.व्ही.आय पी बंदोबस्ताच्या अनुषंगाने देहूरोड वाहतूक विभाग हद्दीतील मार्गावर वाहनांसाठी काही रस्ते बंद करणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत

- **मुकाई चौक ते आदर्शनगर हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांकारीता बंद राहील (कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून).**
  - **पर्यायी मार्ग**-पुणे बाजूकडुन आदर्शनगर येथे जाणाऱ्या वाहनांनी देहूरोड बाजार येथून विकासनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.
- **शिंदे पेट्रोलपंपाकडुन मुकाई चौकाकडे जाणारी सर्व प्रकारचे वाहनांकरीता बंद राहील(कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून)**
  - **पर्यायी मार्ग** -मुंबई कडुन येणारी वाहने एच पी पेट्रोलपंप येथुन डाव्या बाजुस सर्व्हिस रोडने समिर लॉन्स अडरपास येथून डाव्या बाजूने वळुन रावेत गावठाण मार्गे इच्छित स्थळी जातील
- **मुंबई एक्सप्रेस वे वरुन किवळे चौकात रावेत एक्झीट मधून येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंद (कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून)**
  - **पर्यायी मार्ग** - मुंबई कडुन येणारी वाहने एच पी पेट्रोलपंप येथुन डाव्या बाजुस सर्व्हिस रोडने समिर लॉन्स अडरपास येथून डाव्या बाजूने वळुन रावेत गावठाण मार्गे इच्छित स्थळी जातील
- **पुणे कडून मुंबईकडे जाणारी वाहने समिर लॉन्स साईडने कृष्णा हॉटेल चौकाकडे जाण्यास सर्व वाहनांना बंदी राहील (कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून)**
  - **पर्यायी मार्ग**- एक्सप्रेस हायवे ने मुंबई कडे जातील
- **किवळे बस स्टॅण्ड ते विठ्ठल हॉटेल पंक्चर कडे जाणारा साईड रोड सर्व वाहनांसाठी बंद राहील (कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून)**
  - **पर्यायी मार्ग** -मुंबई कडुन येणारी वाहने एच पी पेट्रोलपंप येथुन डाव्या बाजुस सर्व्हिस रोडने समिर लॉन्स अडरपास येथून डाव्या बाजूने वळुन रावेत गावठाण मार्गे इच्छित स्थळी जातील
- **मावळा पुतळा ते विठ्ठल हॉटेल पंक्चर व कृष्णा चौक हॉटेल सँटोसा पंक्चर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील. (कार्यक्रमासाठी येणारी वाहने वगळून)**
  - किवळे गावाकडुन येणारी सर्व प्रकारची वाहने कृष्णा हॉटेल चौक कडे न येता समिर लॉन्स अंडरपास मार्गे इच्छित स्थळी जातील

Scanned with OKEN Scanner

तरी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत वर नमुद केले प्रमाणे दि.०६/०१/२०२४ रोजी सकाळी. ०९/०० ते २४.०० वाजेपावेतो तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. पोलीस, ॲम्ब्युलन्स, फायरब्रिगेड, पेट्रोल, डिझेल टँकर, पीएमपीएमएल बसेस, स्कुल बस, वगळून) करण्यात येत असुन सदर वाहतूक बदलाची अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे तरी नागरीकांनी दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

०५/०१/२०२४.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **देहूरोड** वाहतुक विभाग,

Scanned with OKEN Scanner